**प्रेस नोट दि.०९/०४/२०१९**

## हडपसर पोलीस स्टेशन,पुणे

## एक वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देणारा घरफोडीतील पाहीजे आरोपी जाळयात

मागील एक वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देणारा सराईत गुन्हेगार किरण विश्वनाथ बैज यास हडपसर पोलीस स्टेशनचे सपोनि प्रसाद लोणारे व त्यांच्या टिमने सानपाडा नविमुंबई येथुन ताब्यात घेतले आहे. सदरचा आरोपी हा मागील एक वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देत होता. आरोपीच्या शोधकामी हडपसर पोलीस अनेकवेळा नविमुंबई येथे गेले होते परंतु आरोपी हा पोलीस येण्याआगोदरच पळुन जात होता. सदरच्या आरोपीची चोरी करण्याची पध्दत वेगळी होती, सदरचा आरोपी हा नविमुंबई वरुन सकाळच्या वेळेस मोटारसायकलवर आपला साथीदार सौरभ यादव याचेसोबत येत होता व कुलुप असलेल्या घराची रेकी करुन घरफोडी करुन पुन्हा बाहेरच्या मार्गाने परत मुंबईला पळुन जात होता. सदर गुन्हयाचा तपास सपोनि प्रसाद लोणारे यांनी केला असुन मिळालेल्या फुटेजच्या आधारावर सदरच्या आरोपींची ओळख पटवुन सौरभ यादव रा.सानपाडा नविमुंबई यास दिनांक १५/०४/२०१८ रोजी अटक केलेली होती तर त्याचा साथीदार किरण बैज हा त्यावेळेस पळुन जाण्यात यशस्वी झाला होता. आरोपी किरण बैज हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर नविमुंबई येथेही भरपुर गुन्हे नोंद आहेत. सदरचा आरोपी हा हडपसर पोलीस स्टेशनच्या एकुण ५ गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी होता. सदर आरोपीस दिनांक ०७/०४/२०१९ रोजी गुन्हयात अटक केली असुन पुढील तपास सपोनि प्रसाद लोणारे हे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही मा.सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोहवा/राजेश नवले,पोशि/अनिल कुसाळकर, पोशि/ अमित कांबळे, पोशि/ शाहीद शेख, पोशि/ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.